मालमत्ता कर विभाग
दिनांक

विषय---महाराष्ट्र शासनाच्या नावावर असलेल्या शासकीय भुखंडावर भ्रष्ट मार्गाने व बोगस कागदाद्वारे भुमाफियांच्या नावे करपावती (हाऊस टॅक्स) लावल्याबाबत.

संदर्भ---श्री योगीराज देशमुख, विभाग अध्यक्ष, महाराष्ट्र नवनिर्माण सेवा, कमला नेहरु नगर, धोबीघाट, उल्हासनगर३४२१ ००१ यांचेकडील दिनांक २६/०५/२०२३ रोजीचे पत्र

सादर

उपरोक्त विषयांकित प्रकरणी सादर करण्यात येते की, उल्हासनगर महानगरपालिकेमार्फत पुरविण्यात आलेल्या सेवा सुविधांच्याअनुषंगाने महानगरपालिका क्षेत्रात अस्तित्वात असलेल्या मालमत्तांवर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीनुसार मालमत्ता कर आकारणी व वसुली करण्यात येते. मालमत्ता कर वसुलीकरीता कर देण्यास प्रथम पात्र व्यक्तीचे नावाची नोद आवश्यक आहे. त्यामुळे महानगरपालिका कर आकारणी पुस्तकात फक्त मालमत्ता कर देण्यास प्रथम पात्र व्यक्तीचे नावाची नोंद करण्यात येते सदर नोंदीचा मालकी हक्काशी काहीही संबंध नाही.

उक्त संदर्भिय पत्रान्वये उल्हासनगर-१ व २ या विभागातील महाराष्ट्र शासनाचा भुखंडावर बोगस कागदपत्राद्वारे व खोटया दस्तऐवजाच्याद्वारे करपावत्या (हाऊस टॅक्स) बनवून दिल्या आहेत सदर भुखंडावर महाराष्ट्र शासनाचा फलक असून सदरचा फलक हा मा जिल्हाधिकारी यांचेतर्फे लावण्यात आलेला असताना सुध्दा सदर काही जागेवर शेड टाकुन त्यांच्या कर पावत्या काढण्यात आलेल्या असल्याने सदरच्या कर पावत्या रदद करणेबाबत कळविले आहे

विषयांकित प्रकरणी प्रत्यक्ष पाहणी केली असता महाराष्ट्र शासनाचा फलक असलेल्या जागेमध्ये कोणतेही बांधकाम झालेले नाही मोकळी जागा आहे सदर जागेभोवती २ फुट सिमेंट, दगडाची कुंपनभिंत घातलेली आहे. मोकळी जागा तसेच पार्किंग शेड आहे.

तथापि, शासकीय भुखंडाचे सीमांकन निश्चित करणेकामी सदर प्रकरणी तालुका निरीक्षक, भुमी अभिलेख उल्हासनगर यांचे कार्यालयामार्फत संयुक्तिक पाहणी करणे आवश्यक आहे. तदनंतर पुढील कार्यवाही करणे उचित राहील.

मंजुरीकरीता सादर

लिपीक

कर निरीक्षक

उप कर निर्धारक व संकलक

कर निर्धारक व संकलक

मा.: उपआयुक्त (कर)

श्री देशमुख यांनी तक्रारीत जोडलेल्या ०५ मालमत्तांशी संबंधित असलेल्या नावांचे Assessment कसे झाले या विषयी कोणतेही कायदेशीर कागदपत्र उपलब्ध नाहीत. तसेच सदर ठिकाणी शासन बोर्ड असल्याने नियमाप्रमाणे शासनाचे नाव लावण्याची कार्यवाही करावी
05/07/23

Scanned with CamScanner

मालमत्ता कर विभाग
दिनांक

विषय---महाराष्ट्र शासनाच्या नावावर असलेल्या शासकीय भुखंडावर भ्रष्ट मार्गाने व बोगस कागदाद्वारे भुमाफियांच्या नावे करपावती (हाऊस टॅक्स) लावल्याबाबत.

संदर्भ---श्री योगीराज देशमुख, विभाग अध्यक्ष, महाराष्ट्र नवनिर्माण सेवा, कमला नेहरु नगर, धोबीघाट, उल्हासनगर-४२१ ००१ यांचेकडील दिनांक २६/०५/२०२३ रोजीचे पत्र

**सादर**

उपरोक्त संदर्भिय विषयांकित प्रकरणी, उल्हासनगर महानगरपालिका कर आकारणी पुस्तकात मालमत्ता क्रमांक ०३एओ०१४११९९००, ०३एओ०२१८६५८००, ०३एओ०१४११९८००, ०३एओ०१४१२०१००, ०३एओ०१४१२००००, ०३एओ०१४१२०३००, ०३एओ०२१४२३६०० अन्वये नोंद असलेल्या मिळकतीचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे.

| अ.क्र | मालमत्ता क्रमांक | कर देण्यास प्रथमत पात्र व्यक्तीचे नाव | मिळकतीचा पत्ता | कर निर्धारण वर्ष | बांधकाम प्रकार | वापर | क्षेत्रफळ चौ.फुट |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ०३एओ०१४११९९०० | पमनदास मंगलदास गंगवानी | कमला नेहरु धोबीघाट, उल्हासनगर-१ | ०१-०४-१९९१<br>०१-०४-१९९१ | पत्रेविटा<br>मोकळी जागा | अनिवासी<br>अनिवासी | २५५<br>५७३० |
| २ | ०३एओ०२१८६५८०० | सन्नो किसन पवार | कमला नेहरु नगर, धोबीघाट, उल्हासनगर-१ | ०१-०४-२०२० | पत्रेविटा | निवासी | १५० |
| ३ | ०३एओ०१४११९८०० | शंकर रायलदास लुंड | कमला नेहरु नगर, धोबीघाट, उल्हासनगर-१ | ०१-०४-१९९१<br>०१-०४-१९९१ | मोकळी जागा<br>पत्रेविटा | अनिवासी<br>अनिवासी | ११५८४<br>११७ |
| ४ | ०३एओ०१४१२०१०० | किशनचंद पी गंगवानी | कमला नेहरु नगर, धोबीघाट, उल्हासनगर-१ | ०१-०४-१९९१<br>०१-०४-१९९१ | मोकळी जागा<br>पत्रेविटा | अनिवासी<br>अनिवासी | ५४२७<br>४१४ |
| ५ | ०३एओ०१४१२०००० | किशनचंद पेसुमल सचदेव | कमला नेहरु नगर, धोबीघाट, उल्हासनगर-१ | ०१-०४-१९९१<br>०१-०४-१९९१ | मोकळी जागा<br>पत्रेविटा | अनिवासी<br>अनिवासी | ११३२६<br>३७४ |
| ६ | ०३एओ०१४१२०३०० | महिंदर एस पुरस्वानी . | कमला नेहरु नगर, धोबीघाट, उल्हासनगर-१ | ०१-०४-१९९१<br>०१-०४-१९९१ | पत्रेविटा<br>मोकळी जागा | अनिवासी<br>अनिवासी | २६६<br>११४३४ |
| ७ | ०३एओ०२१४२३६०० | अलका कैलास बाघचौरे | कमला नेहरु नगर, धोबीघाट, पांडे बिल्डींग मागे, उल्हासनगर-१ | १६-१२-२०१७<br>१६-१२-२०१७<br>१६-१२-२०१७<br>१६-१२-२०१७<br>१६-१२-२०१७<br>१६-१२-२०१७<br>१८-०२-२०२१ | पत्रेविटा<br>पत्रेविटा<br>पत्रेविटा<br>पत्रेविटा<br>पत्रेविटा<br>मोकळी जागा<br>पत्रेविटा | निवासी<br>निवासी<br>निवासी<br>निवासी<br>निवासी<br>निवासी<br>निवासी | १०५<br>१६५<br>३५<br>८०<br>२०<br>१२०<br>४५० |

श्री योगीराज देशमुख यांनी महाराष्ट्र शासनाचा भुखंडावर बोगस कागदपत्राद्वारे व खोटया दस्तऐवजाच्याद्वारे करपावत्या (हाऊस टॅक्स) बनवून दिल्या आहेत सदर भुखंडावर महाराष्ट्र शासनाचा फलक असून सदरचा फलक हा मा जिल्हाधिकारी यांचेतर्फे लावण्यात आलेला असताना सुध्दा सदर काही जागेवर शेड टाकुन त्यांच्या कर पावत्या काढण्यात आलेल्या असल्याने सदरच्या कर पावत्या (मालमत्ता क्रमांक ०३एओ०१४११९९००, ०३एओ०२१८६५८००, ०३एओ०१४११९८००, ०३एओ०१४१२०१००, ०३एओ०१४१२००००, ०३एओ०१४१२०३००, ०३एओ०२१४२३६००) रदद करणेबाबत दिनांक २६/०५/२०२३ रोजीचे अर्जान्वये तक्रार दाखल केली आहे. सोबत महाराष्ट्र शासनाकडील मालमत्ता पत्रकाची प्रत (हक्काचा मुळ धारक-- महाराष्ट्र शासन, नगर भूमापन क्रमांक ७९१, ७९२/अ, ७९३/अ, ७९५, ७९६, ७७२, ८११, ८१२, ८१३, ८१४, ८१५, ७९०, ७८९, ७८८, ७८७, ७८६, ७८५) सादर केली आहे.

Scanned with CamScanner

श्री योगीराज देशमुख यांनी दाखल केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने संबंधित कर निरीक्षक यांनी प्रत्यक्ष पाहणी केली असता सदरील जागा शासनाचे मालकीची असल्याने यावर अतिक्रमण केल्यास कायदेशिर कारवाई करण्यात येईल, असा महाराष्ट्र शासनाचा फलक लावण्यात आलेला आहे. सोबत छायाचित्र जोडत आहे. तसेच महाराष्ट्र शासनाकडील मालमत्ता पत्रकात (हक्काचा मुळ धारक-- महाराष्ट्र शासन, नगर भूमापन क्रमांक ७९१, ७९२/अ, ७९३/अ, ७९५, ७९६, ७७२, ८११, ८१२, ८१३, ८१४, ८१५, ७९०, ७८९, ७८८, ७८७, ७८६, ७८५) सदरील जागा महाराष्ट्र शासनाच्या नावे आहे. तसेच उक्त मिळकतींकरीता कर देण्यास प्रथमत पात्र व्यक्तीचे नावाची नोंद करणेसंबंधी कोणतेही कायदेशिर कागदपत्रे कर विभागात उपलब्ध नाहीत.

उल्हासनगर महानगरपालिकेमार्फत पुरविण्यात आलेल्या सेवा सुविधांच्या अनुषंगाने महानगरपालिका क्षेत्रात अस्तित्वात असलेल्या मालमत्तांवर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीनुसार मालमत्ता कर आकारणी व वसुली करण्यात येते. मालमत्ता कर वसुलीकरीता कर देण्यास प्रथम पात्र व्यक्तीचे नावाची नोंद आवश्यक आहे. त्यामुळे महानगरपालिका कर आकारणी पुस्तकात फक्त मालमत्ता कर देण्यास प्रथम पात्र व्यक्तीचे नावाची नोंद करण्यात येते सदर नोंदीचा मालकी हक्काशी काहीही संबंध नाही.

त्याअनुषंगाने श्री योगीराज देशमुख यांनी दाखल केलेला अर्ज व उपलब्ध कागदपत्राच्या आधारे उल्हासनगर महानगरपालिका कर आकारणी पुस्तकात मालमत्ता क्रमांक ०३एओ०१४११९९००, ०३एओ०२१८६५८००, ०३एओ०१४११९८००, ०३एओ०१४१२०१००, ०३एओ०१४१२००००, ०३एओ०१४१२०३००, ०३एओ०२१४२३६०० अन्वये नोंद असलेल्या मिळकतीकरीता कर देण्यास प्रथमत पात्र व्यक्ती म्हणुन **महाराष्ट्र शासन** अशी नोंद वर्ष २०२३-२०२४ पासुन करणेसाठी मंजुरी मिळावी

(वैशाली चौधरी)
लिपीक

(गणेश शिंदे)
कर निरीक्षक

(उध्दव लुल्ला)
उप कर निर्धारक व संकलक

(जेठानंद सा करमंचदानी)
कर निर्धारक व संकलक

13/07/23
(प्रियंका राजपूत)
मा उप आयुक्त (कर)

Scanned with CamScanner

उल्हासनगर महानगरपालिका


# महाराष्ट्र नवनिर्माण सेना

अध्यक्ष - मा.श्री.राजसाहेब ठाकरे

निशाणी -रेल्वे इंजिन

**श्री.योगीराज देशमुख**

विभाग अध्यक्ष


३६२

प्रति,
मा. जिल्हाधिकारी साहेब
जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे,
जि ठाणे

उल्हासनगर महानगरपालिका
मा. आयुक्तांचे कार्यालय
26 MAY 2023
आवक क्र. २९६४
विभाग:-
अति.आयुक्त (से./श.) आयुक्त

आवक महसुल सहायक
जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे

दिनांक : २३/०५/२३

विषय :- महाराष्ट्र शासनाच्या नावावर असलेल्या शासकीय भुखंडावर भ्रष्ट मार्गाने व बोगस कागदपत्राद्वारे भुमाफियांच्या नावे करपावती(हाऊस टॅक्स) लावल्याबाबत

मा.महोदय,

आपणास विनंती की, उल्हासनगर-१ व २ या विभागातील महाराष्ट्र शासनाचा भुखंडावर मालमत्ता कर विभागाचे अधिकारी हे गैरव्यवहार करुन भुमाफियांना त्या जागेवर महापालिकेच्या कर (हाऊस टॅक्स) विभागातील काही अधिका-यांनी बोगस कागदपत्राद्वारे व खोटया दस्तऐवजाच्याद्वारे करपावत्या (हाऊस टॅक्स) बनवून दिल्या आहेत. तरी सदर भुखंडावर महाराष्ट्र शासनाचा फलक असून सदरचा फलक हा मा. जिल्हाधिकारी यांचे तर्फे लावण्यात आलेला असतांना सुध्दा सदर काही जागेवर शेड टाकून त्यांच्या करपावत्या काढण्यात आलेल्या आहे.

सदर प्रकरणाची गांर्भीर्य लक्षात घेवून शासकीय भुखंडावर भुमाफियांच्या नावे करपावत्या (हाऊस टॅक्स) काढल्या त्या तात्काळ रद्द कराव्यात व सदर प्रकरणी सखोल चौकशी करुन करपावत्या बनवून देण्या-या मालमत्ता करविभागाचे अधिकारी व कर्मचारी यांच्यावर निंलबनाची कारवाई करण्यात यावे.

'Imp' DMC (Tax) ... necess. action expected if it is govt. land and fraudulent documents submitted; n/a must be taken

उल्हासनगर महानगरपालिका
उप आयुक्त (कर) यांचे कार्यालय
आवक/जावक क्र. २५८६
दिनांक २६/५/२०२३

..२/

HOD ... तपासून Report ... 29/05/23

26/5


कार्यालय : कमला नेहरु नगर, धोबीघाट, उल्हासनगर-४२१००१
भ्रमणध्वनी : ९८०६८८३१४० / ~~९६६६५९९१५०~~


Scanned with CamScanner

टिप:- वारंवार तक्रार व भेटी गाठी घेऊन सुध्दा आपले अधिकारी त्या भुमाफियांना सहकार्य करत आहे. तसेच वारंवार तक्रारी अर्ज करुन देखील आपल्याकडून काही एक कारवाई होत नाही. उलट आपल्या प्रशासनाकडुन आमच्यावरच खोटे गुन्हे दाखल होत आहेत. भुमाफीयांकडून मला मारहाण झालेली आहे व घरावर दगडफेक करुन हल्ले झालेले आहेत असे प्रकार तीन ते चार वेळा झालेले असुन यापुढे सुध्दा माझे जिवीतास धोका निर्माण झालेला आहे.

आपला विश्वासू

योगीराज नवनाथ देशमुख

<u>प्रत रवाना</u> :

मा. आयुक्त साहेब
उल्हासनगर महानगरपालिका,
उल्हासनगर-३, जि ठाणे

स्विय सहाय्यक
मा. आयुक्त यांचे कार्यालय
उल्हासनगर महानगरपालिका

मा. प्रधान सचिव (नवि-२)
नगरविकास विभाग महाराष्ट्र शासन,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२

उपायुक्त कर निर्धारक तपासणी करून अहवाल सादर करावे

कर निर्धारक
उपलब्ध कागदपत्रे तपासून नियमानुसार महाराष्ट्र शासनाचे नोट ... कारवाई करावे ०३/०३/२३